CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३२० वा ▶ शुक्रवार दि. १५ सप्टेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## मुंबईत खासगी विमान कोसळलं, लँडिंग करताना दोन तुकडे

**मुंबई ।** मुंबई विमानतळावर खासगी विमान कोसळलं आहे. खराब हवामानामुळे हे विमान कोसळल्याची माहिती आहे. या



एअरक्राफ्टमधून प्रवास करत असलेल्यांपैकी तीन जण जखमी झाल्याची माहिती आहे. हे विमान विशाखापट्टनमवरून मुंबईला येत होतं. प्राथमिक माहितीनुसार, विमान लँडिंग करताना ही दुर्घटना घडल्याचं सांगण्यात येत आहे. ही दुर्घटना इतकी भीषण होती की, या अपघातानंतर विमानाचे दोन तुकडे झाल्याचं सांगण्यात येत आहे. या विमानात ६ प्रवासी आणि २ क्रू मेंबर्ससह ८ जण प्रवास करत होते.

# प्रतिकूल परिस्थितीमध्येही पोळा उत्साहात साजरा

## जिल्ह्यात बैल पोळ्याची परंपरा कायम..!

**धुळे । प्रतिनिधी**

बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या कष्टाचे आभार मानण्यासाठी काल महाराष्ट्रातील विविध ठिकाणी बैलपोळ्याचा सण आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच बैल पोळ्यानिमित सपत्नीक पूजन जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्राध्यापक अरविंद जाधव व सौ.जाधव यांनी केले.

जिल्ह्यातही हा बैल पोळा साजरा करण्यात आला. या निमित्ताने प्रत्येक गावात शेतकरी बांधवांनी स्वतःच्या बैलांसोबत हा सण साजरा केला. गावातील देवी देवतेला शेतकऱ्यांनी बैलांबरोबर प्रदक्षिणा घालून पुढील वर्षी शेतात चांगले उत्पन्न निघू देत अशी प्रार्थना केली. बैलांना साजशृंगार करून हा बैलपोळा साजरा करण्यात आला. वर्षभर शेतात शेतकऱ्यांची मदत करण्यासाठी अपार कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचा सच्चा मित्र बैल यांना बैलपोळ्याच्या दिवशी गळ्यांत चंगाळी शिंगाना कलर अंगावर कलरने विविध प्रकारची सजावट अंगावर झुली या पध्दतीने पोळ्यानिमित्त बैलाची सजावट करण्यात आली होती. घरात पुरण पोळीचा स्वयपाक करुन बैलाची पुजा करुन बैलाना पुरणपोळी खाऊ घालण्यात आली. वर्षभर शेतातील विविध कामात शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या बैलाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा बैलपोळ्याचा सण साजरा करण्यात येतो. यावर्षी मागील काही आठवड्यांपासुन पावसाने उघडीप दिली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील असलेले प्रमुख पिक सोयाबीनच्या उत्पन्नात मोठी घट होऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडणार आहेत. मात्र तरीही बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मोठ्या उत्साहात शेतकऱ्यांनी हा सण साजरा केला आहे. बैलपोळ्या निमित्त या भागात शेतकरी दिवसभर उपाशी राहुन बैलाचा उपहास करतात बैलांना सायंकाळी पुरणपोळीचे जेवण दिल्यानतंरच शेतकरी जेवण करतात. बैल पोळ्यानिमित्त शेतकऱ्यांनी बैलाची सजावट करुन घरी पूरण पोळीचा स्वयपाक करुन सायंकाळी पाच वाजणेच्या सुमारास बैलाची व इतर पशुधनाची विधीवत पुजा करुन बैलाना व इतर पशुधनाला पुरणपोळीचे जेवण दिल्यानतंर शेतकऱ्यांनी जेवण करुण उपवास सोडला.









### शेतकऱ्यांच्या जीवनात भरभराट होऊ दे : माजी कृषीमंत्री रोहिदास पाटील

दुष्काळाचे सावट दूर होऊ दे! बळीराजाच्या जीवनात भरभराट आणि सुख-समृद्धी येऊ दे! अशी प्रार्थना करीत माजी कृषीमंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील यांनी पोळा सणानिमित्ताने आपल्या शेतात जाऊन सपत्नीक बैलजोडीची पूजा केली. यावेळी माजी कृषी मंत्री पाटील यांनी शेतकरी बांधवांना पोळा सणानिमित्ताने शुभेच्छाही दिल्या. वर्षातून एकदा येणारा सण असल्यामुळे आणि शेतकऱ्यांच्या जिवाभावाचा सखा समजल्या जाणाऱ्या बैलजोडीची पूजा करणे महत्त्वाचे असते, म्हणून जिल्ह्यात सर्वत्र बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकऱ्यांनी बैलपोळा उत्साहात साजरा केला. त्या अनुषंगाने माजी कृषी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील आणि सौ.लता रोहिदास पाटील यांनीही बैलजोडीची पूजा केली. काटसर(अजंग) ता.धुळे येथील आपल्या शेतात असलेल्या बैलजोडीला परंपरेनुसार पुरणपोळीचा घास भरवत बैलजोडीचे औक्षण केले. दरम्यान दुष्काळामुळे शेतकरी चिंतातूर असून दुष्काळाचे सावट दूर होऊन येणाऱ्या रब्बी हंगामाची तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची,चाऱ्याची सोय व्हावी म्हणून वरूणराजाने कृपा करावी. असे साकडेही माजी कृषीमंत्री रोहिदास पाटील यांनी घातले. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांना पोळा सणाच्या शुभेच्छाही दिल्या.

### चिमठाणे गावात पारंपरिक पद्धतीने साजरा

शिंदखेडा तालुक्यातील चिमठाणे पोळा सण पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. गावातील मारुती मंदिराजवळ सर्व शेतक-यांनी बैलांना सजवून आणले होते.बळीराजाने बैलांना सजवण्यासाठी गळ्यातील घुंगरू, कासरे, बेगड, हिंगुळ, व विविध प्रकारच्या रंगांची मनसोक्त खरेदी करून बैलांना सजवून हनुमान मंदिरासमोर पूजा व नारळ फोडून औक्षण करण्यात आले.

### सर्जा राजा सजला

जिल्ह्यात या दिवशी बैलाच्या खांद्यावर तसेच त्यांच्या पाठीवर नक्षीकाम केलेली झूल, सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या आणि घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा पायात चांदीचे वा करदोड्याचे तोडे घालतात. गोड पुरणपोळी आणि सुग्रास अन्नाचा नैवेद्य दाखविण्यात आला.

### सर्जा-राजासह कापला केक

बागलाण तालुक्यातील पश्चिम पट्ट्यात असलेल्या मोरकुरे या आदिवासी गावातील एका युवा शेतकऱ्याने बैल पोळ्याच्या दिवशी आपल्या लाडक्या बैलजोडीचा केक कापून बैलपोळा साजरा केला आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात हा चर्चेचा विषय बनला असून या युवा शेतकऱ्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, कृष्णा दूमसे असे या युवा शेतकऱ्याचे नाव असून त्याने आज बैलपोळा सणाच्या दिवशी आपल्या बैलजोडीचा धुमधडाक्यात आणि वाजतगाजत केक कापून बैलपोळा साजरा केला. त्याच्या या कृतीची मोरकुरे गावासह बागलाण तालुक्यात चांगलीच चर्चा सुरु आहे.

## न्यूज कॉलम

### अपार्टमेंटमधून दुचाकींची चोरी

**नाशिक ।** हिरावाडी येथील निललक्ष्मी अपार्टमेंटमधून राजेश कमलाकर टिभे (रा. हिरावाडी) यांची दुचाकी (एमएच- १५- सीवाय-४६०८) रविवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी पंचवटी पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. तर, सातपूर एमआयडीसीतील नामांकित कंपनीबाहेर उभी केलेली स्कूटर (एमएच १५ ईवाय १४३१) चोरीला गेली. सागर बबन पवार (रा. विहीतगाव) यांच्या फिर्यादीनुसार, मंगळवारी (ता. १२) चोरीला गेली असून सातपूर पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आला आहे.

### सिडको परिसरातून कार लंपास

**धुळे ।** येथील सिंहस्थनगरमधून २ लाख ७० हजारांची इर्टिगा कार (एमएच १५ जीएल ९८०५) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. गणेश भाऊसाहेब निकम (रा. हनुमान चौक, सिडको) यांच्या फिर्यादीनुसार, सोमवारी (ता. ११) पहाटे तीनच्या सुमारास देवांग डेअरीजवळ पार्क केलेली कार चोरीला गेली. याप्रकरणी अंबड पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नका



### तेली समाजाच्यावतीने निदर्शन

**धुळे । प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाला आमचा विरोध नाही. मात्र, ओबीसी आरक्षणाला धक्का लागायला नको; यासाठी आज धुळ्यात तेली तिळवण समाजाच्यावतीने निदर्शने करण्यात आली. तसेच आपले म्हणणे शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी निवासी जिल्हाधिकार्यांना निवेदनही देण्यात आले.

तेली तिळवण समाजाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर भगवान करनकाळ यांच्या नेतृत्वात आज जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करण्यात आली. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीस आमचा पूर्ण पाठिंबा आहे. मात्र, आरक्षण देताना ओबीसी जातींचे आरक्षण कमी व्हायला नको. ओबीसी आरक्षण टक्केवारी पुर्वीसारखीच रहावी. त्यातील बदल सहन केला जाणार नाही. त्याऐवजी मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याची भूमिका तेली समाजाने घेतली आहे. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष भगवान करनकाळ यांच्यासह महापौर प्रतिभा चौधरी, मा. महापौर जयश्री अहिरराव, युवराज चौधरी, महादू चौधरी, आनंदा चौधरी, वैशाली चौधरी, ज्योती चौधरी, दिपीका चौधरी, प्रकाश बोरसे, यतीन चौधरी, अशोक बोरसे, किशोर बोरसे, यशवंत चौधरी, सचिन चौधरी, विजय चौधरी, रविंद्र चौधरी, राजेंद्र चौधरी, कैलास चौधरी, कमलाकर अहिरराव आदी उपस्थित होते.

## गुटखाशौकीनांवर कारवाई करा : कल्याणी अंपळकर

**धुळे । प्रतिनिधी**

कल्याणी अंपळकर यांनी मनपा आवारात गुटखाशौकीन घाण करीत असल्याची तक्रार केली. तसेच पाणी जार वितरीत करणारे देखील लिफ्टमध्ये घाण करतात, अशी तक्रार केली. त्यावर संबंधीत अधिकार्याने याकामी एका लिपिकाची नेमणूक करण्यात आली असून गुटखा खाऊन घाण करणार्याला पहिले ५०० रूपये व त्यानंतर १ हजार रूपये दंड करीत असल्याचा खुलासा केला.

गेल्या चार वर्षांपासून मनपा शाळा क्र.१४ नव्याने बांधण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. याविषयी पालकमंत्री गिरीष महाजन यांनी तातडीने कार्यवाही करण्यात यावी, असे सुचितही केले होते. मात्र अद्याप हा प्रश्न सुटलेला नाही. त्यामुळे मराठी भाषा जीवंत ठेवायची आहे की नाही? असा कळकळीचा प्रश्न सदस्य हर्षकुमार रेलन यांनी स्थायी समितीच्या सभेत विचारला. नेहमीप्रमाणे सभागृहात मूलभूत प्रश्नांवर सदस्यांनी आसूड ओढले. सभापती किरण कुलेवार यांनी सदस्यांनी गेल्या सभेत विचारलेले प्रश्न पुन्हा-पुन्हा विचारू नये, अशी सुचना केली. यावर सदस्य हर्षकुमार रेलन यांनी समस्येचे निवारण झालेले नसल्यास पुन्हा प्रश्न विचारायचा नाही का? अशी विचारणा केली. सोबतच प्रभाग क्र. ७ मधील शाळा क्र.१४ चा प्रश्न उपस्थित केला. त्यावर सभापती किरण कुलेवार यांनी 'काम खरंच होत नाही', अशी नाराजी व्यक्त करीत संबंधीत अधिकार्यांना खुलासा करण्याच्या सुचना केल्यात. त्यावर प्रदीप चव्हाण यांनी सर्व्हे झाला असून पुणे येथील एजन्सीकडील अहवाल आल्यावर तो सभागृहात सादर केला जाईल, असे उत्तर दिले. त्यावर सदस्य सुनिल बैसाणे यांनी आक्षेप घेत कुठल्याही कामासंबंधीचा आढावा आपल्या पातळीवर घेणे गरजेचे आहे. तेव्हाच विकासकामे मार्गी लवकर लागतील; असे सुचित केले.

## मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही : मुख्यमंत्री

### सतरा दिवसानंतर जरांगे पाटलांचे उपोषण मागे

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा समाजाला टिकणारं आरक्षण मिळालं पाहिजे हीच आमची भूमिका आहे. मराठा समाजाला आरक्षण देणं ही आमची जबाबदारी असल्याचे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केलं. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकार कटीबद्ध असून कोणत्याही समाजावर अन्यान होणार नसल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही तोपर्यंत स्वस्त बसणार नसल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या १७ दिवसांपासून मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरु होते. आज अखेर मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत जरांगे यांनी उपोषण मागे घेतलं. त्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते.



मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण हे सकल मराठा समाजासाठी असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मराठा समाजाला टिकणारं आरक्षण मिळालं पाहिजे. आम्ही फसवणू करणार नाही, आरक्षण देणं ही आमची जबाबदारी असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मराठा आरक्षणाच्या बाबतीत सुप्रीम कोर्टानं ज्या त्रुटी दाखवल्या आहेत, त्या त्रुटींवर सरकारचे काम सुरु असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. टिकणारं आरक्षण कसं मिळेल हीच सरकारची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मला देखील या ठिकाणी येण्याच्या संदर्भात काही जणांनी सांगितले होते. पण प्रोटोकॉल बाजूला ठेवून मी मनोज जरांगे पाटील यांना भेटायचे ठरवल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. कमिटीच्या माध्यमातून सगळ्या प्रक्रिया पूर्ण करण्याचे काम केलं जाईल. यासाठी आपल्याला वारंवार भेटावं लागेल असे मुख्यमंत्री म्हणाले. आरक्षणाचा तिढा सोडवण्यासाठी तज्ज्ञांची मदत लागणार आहे. त्यांच्याकडे असणारी माहिती त्यांनी द्यावी. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी तब्बेतीची काळजी घेतली पाहिजे. बाकीच्यांनी देखील त्याच्या तब्बेतीची काळजी घेतली पाहिजे. इतके दिवस उपोषण केलं आहे, त्यामुळं तुम्ही रुग्णालयात उपचार घ्यावेत असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. सरकार आरण देणार आहे. पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येणार नाही असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

## नाशिक येथे हस्ती बँकेचा ‘उत्कृष्ट नागरी सहकारी बँक ’ पुरस्काराने गौरव

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

दोंडाईचा मुख्यालय असलेल्या व राज्यभर कार्यविस्तारासोबत नावलौकिक प्राप्त, उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दि हस्ती को-ऑप बँकेला, दि महाराष्ट्र स्टेट को -ऑपरेटिव्ह बँकस् असोसिएशन लि. मुंबई तर्फे नागरी सहकारी बँकांना दिला जाणारा नाशिक विभागीय पातळीवरील ' कै. पद्मभूषण वसंतदादा पाटिल उत्कृष्ट नागरी सहकारी बँक २०२१ - २२' या विशेष पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.




सदरचा पुरस्कार वितरणाचा दिमाखदार सोहळा दि. ९ सप्टेंबर २०२३ शनिवार रोजी नाशिक येथे माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांचे शुभ हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी अनिल कवडे - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य - पुणे, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकस् असोसिएशन लि. मुंबई अध्यक्ष विश्वास ठाकुर, उपाध्यक्ष - वसंत घुईखेडकर, सहकार भारतीच्या अध्यक्षा शशिताई अहिरे, हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी हस्ती बँकेचे संचालक संजय दुग्गड, अक्षय छाजेड, उल्हास रत्नपारखी, भवरलालजी जैन, कुंदनमलजी गोगड, किशोर संकलेचा यांनी पुरस्कार स्विकारला. हा पुरस्कार रू.५०० कोटी ते १००० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँक गटातून हस्ती बँकेस नाशिक विभागातून ' कै. पद्मभूषण वसंतदादा पाटिल उत्कृष्ट नागरी सहकारी बँक २०२१ - २२ पुरस्कार ' प्राप्त झाला आहे. तज्ञ निवड समितीने केलेल्या मुल्यांकनाच्या आधारावर हस्ती बँक सर्वोत्कृष्ट नागरी सहकारी बँक ठरली आहे. दरवर्षी सहकारी बँकिंग क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या सभासद नागरी सहकारी बँकाच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकस् असोसिएशन उत्कृष्ट नागरी सहकारी बँक पुरस्काराने सन्मानीत करीत असते.

### हस्ती बँकेला राष्ट्रीय पातळीवरील ४६ पुरस्कार

हस्ती बँकेला ' कै. पद्मभूषण वसंतदादा पाटिल उत्कृष्ट नागरी सहकारी बँक पुरस्कार-२०२१ - २२ ' ह्या विशेष पुरस्काराचा सन्मान प्राप्त झाला. यास्तव सर्व संचालक मंडळ, बँकेचे अधिकारी व कर्मचारी वर्गाने आनंद व्यक्त केला. आजतागायत बँकेस राज्य व राष्ट्रीय पातळीवरील ४६ पुरस्कारांचे सन्मान प्राप्त झाले आहेत.

बँकेचे संस्थापक स्व. हस्तीमलजी जैन, मार्गदर्शक स्व. शांतीलालजी जैन व आधारस्तंभ स्व. कांतीलालजी जैन यांनी घालून दिलेले नियम व पद्धतींचे पालन करीत, बँक सातत्याने प्रगती पथावर आहे. बँकेचे विद्यमान जेष्ठ संचालक व माजी प्रेसिडेंट मदनलालजी जैन, बोर्ड ऑफ मैनेजमेंट चे चेयरमन किशोर जैन तथा सर्व संचालक मंडळ व व्यवस्थापन मंडळ तसेच कुचेरिया साहेब, सीईओ सतीश जैन यांचे कुशल मार्गदर्शनखाली बँक सर्व क्षेत्रात प्रगती साधत आहे, असे प्रतिपादन बँकेचे प्रेसिडेंट कैलास जैन यांनी यावेळी केले. तसेच बँकेचे खातेदार व ग्राहक यांच्या सहकार्याने तथा बँकेच्या वरीष्ठ अधिकारी व कर्मचारी यांच्या सांघीक कामामुळे बँकेने हा टप्पा गाठला आहे. या सर्वांचे मी अभिनंदन करतो. अशा भावनाही याप्रसंगी त्यांनी व्यक्त केल्या.

## लाचखोर कनिष्ठ लिपिक ताब्यात

**नाशिक । प्रतिनिधी**

वेतन संबंधी प्रस्ताव मंजूर करण्यासाठी शिक्षण उपसंचालक कार्यालयातील कनिष्ठ लिपिकाने ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून ती स्विकारतांना एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहाथ पकडले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिगंबर अर्जुन साळवे (कनिष्ठ लिपिक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक, वर्ग ३, वय ५५, रा. टाकळी, भीमशक्ती नगर, नाशिक) असे लाचखोर अधिकार्याचे नाव आहे. तक्रारदार हे नाशिक शहरातील एका खासगी शाळेत १३ डिसेंबर २०१९ ते ३१ डिसेंबर २०२२ या काळात शिक्षण सेवक म्हणून नोकरीस होते व त्यानंतर शिपाई या पदासाठी त्यांची मान्यता आली. यानंतर ते १ जानेवारी २०२३ पासून ते अतापर्यंत त्या शाळेत शिपाई या पदावर कार्यरत आहे. त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारे वेतन मिळालेले नाही.

वेतन मिळण्यासाठी आवश्यक असलेला शालार्थ क्रमांक मिळण्यासाठी त्यांनी शाळेच्या मार्फत शिक्षणाधिकारी कार्यालयात प्रस्ताव पाठवला होता. हा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी शिक्षण उपसंचालक कार्यालयातील कनिष्ठ लिपिक यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष ५० हजार रुपये लाचेची मागणी करून ती बुधवार (दि.१३) रोजी पचासमक्ष नाशिक शिक्षण उपसंचालक कार्यालयात स्वीकारली. यावेळी त्यांना पकडण्यात आले आहे.

## एसटीचे आंदोलन मागे..!

श्रीगणरायाचे आगमन येत्या १९ सप्टेंबर रोजी होत असून बाप्पाच्या स्वागतासाठी एसटी महामंडळही तयारीला लागले होते. गणेश चतुर्थीच्या निमित्ताने कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी एसटी महामंडळाने यंदा १४ ते १९ सप्टेंबर दरम्यान तीन हजारांपेक्षा जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला. त्यापैकी १७०० बसेसचे गट आरक्षण पूर्ण झाले आहे. आवश्यक वाटल्यास आणखी काही गाड्या सोडण्याची तयारी एसटी महामंडळाने दाखवली आहे. या जादा बसेस मुंबई, ठाणे, पालघर या विभागांतील प्रमुख बसस्थानकातून सोडण्यात येणार आहेत. मात्र एका बाजूला एसटी महामंडळाकडून इतर डेपोतील गाड्या कोकणाकडे कशा वळविल्या जातील, याचा विचार केला जात असताना, राज्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कामगार संघटनेकडून सोमवारपासून एसटी कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यावेळी संघटनेकडून राज्य सरकारला दोन दिवसांचे अल्टिमेटम देखील दिले होते. मात्र त्यापूर्वीच एसटी कामगार संघटनेकडून तूर्त आंदोलन मागे घेण्यात आल्यामुळे विशेषत: कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांनी निश्वास सोडला आहे. एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता देण्याची मागणी राज्य सरकारकडून मान्य करण्यात आली. एसटी कर्मचाऱ्यांची सोमवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांच्यासोबत बैठक झाली होती. या बैठकीत एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याचा दर ३८ टक्क्यांवरून ४२ टक्के करण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलन मागे घेतले आहे. मागील आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी दिली आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३४ टक्क्यांवरून ३८ टक्के करण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली होती. सध्या राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेतनासाठी शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात येते. त्यामुळे महागाई भत्त्यामध्ये ४ टक्क्यांची वाढ झाल्याने सरकारवर ९ कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. तरीही कर्मचारी संघटनेच्या म्हणण्यानुसार कर्मचाऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली, त्यात काहीही नवीन नाही, असा पवित्रा घेत आझाद मैदानात एसटीतील कर्मचारी उपोषणाला बसले होते. जालना येथील मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी ठाम भूमिका घेणाऱ्या मनोज जरांगे-पाटील यांच्यामुळे सुरू असलेल्या आंदोलनामुळे राज्यभर त्याचे पडसाद उमटले आहेत. त्यामुळे ऐन गणेशोत्सव काळात एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्यास सर्वसामान्य नागरिकांचे हाल झाले असते. मात्र राज्य सरकारने या प्रश्नांवर गांभीर्याने भूमिका घेत, कर्मचारी संघटनेशी सकारात्मक चर्चा केली. मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत मंगळवारी बैठकीत झालेल्या निर्णयानुसार एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता आता ३८ टक्क्यांवरून ४२ टक्के देण्यात येईल, असा निर्णय झाला. तसेच एसटी कर्मचाऱ्यांची जी थकबाकी आहे, त्यासंदर्भात १५ दिवसांत निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन उदय सामंत यांनी दिले. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता आणि आर्थिक देणीबाबत समिती नेमून ६० दिवसांत अहवाल देण्याचे सरकारने मान्य केले आहे. एसटी कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना तसेच सेवानिवृत्त कामगार व पत्नीस सर्व प्रकारच्या बसमध्ये कुठलाही फरक न आकारता मोफत पास देण्याचा प्रस्ताव महामंडळाच्या संचालक मंडळांपुढे सादर करावा, या मागण्या मान्य झाल्याने आपले उपोषण आंदोलन स्थगित करत आहोत, असे संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी जाहीर केल्याने राज्यातील सर्वसामान्य एसटी प्रवासी एका अर्थाने खूश झाला आहे. एक वर्षांपूर्वी एसटी कर्मचाऱ्यांनी एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण घेण्याच्या मागणीच्या मुद्द्यावरून ५४ दिवसांपेक्षा अधिक काळ संप केला होता. हा संप मिटविण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला होता.

# भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया



**अभियंता दिनानिमित आज सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया उर्फ MV सर उर्फ जादुगार इंजिनीअर यांच्या स्मृतीला उजाळा देणे अत्यावशक ठरते. कारण त्यांची प्रकाशमान कारकीर्द आजच्या व भावी अभियंत्यांना मार्गदर्शन व एक आदर्श सतत डोळ्यासमोर ठेवणे शक्य होईल.**

सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांचा जन्म दि.१५सप्टेंबर १८६० रोजी एका छोट्या खेडेगावात म्हणजे मुदनहलली येथे झाला. त्यांच्या आईने त्यांचे पालनपोषण व शिक्षण केले. त्यांना भावाची मदत मिळाली. १८८१ मध्ये ते बेंगुरूळ येथून बी.ए. प्रथम क्रमांकाने पास झाले. १८८४ मध्ये त्यांनी पुणे येथून सिव्हील इंजिनीरिंगची पदवी, शिष्यवृत्ती सह प्रथम क्रमांकाने मिळवली.त्यांनी जेम्स बर्कले पुरस्कार देण्यात आला.

त्यांच्या उज्वल कारकिर्दीची घोडदौड सुरु झाली. त्यांच्या जॉब पोस्टिंगची पहिली पायरी म्हणजे १८८४ साली त्यांची नेमणूक नाशिक येथे झाली. खानदेश परीसरासाठी त्याच कालावधीत त्यांचे वास्तव्य धुळे येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग, साक्री रोड धुळे येथे राहिले.

श्री.मुकुंद धाराशिवकर यांच्या कल्पकतेने, त्याच वास्तू मध्ये, सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया स्मृती समितीच्या माध्यमाने १५ सप्टेंबर २०१३ रोजी एक उत्कृष्ट संग्रहालय उभारण्यात आले आहे. धुळेकारांसाठी हि अभिमानाची बात आहे.

सर विश्वेश्वरैया यांच्या धुळे येथील वास्तव्या दरम्यान खानदेशात फड पद्धती अवलंबनात आणली. डेडरगाव तलाव ते धुळे शहर पाणीपुरवठा १६ किमी पाईपलाईन सह पूर्ण केली, जी आजदेखील कार्यरत आहे. दातर्ती येथे सायफन तयार केला.

१८८५ साली खात्याची परीक्षा उतीर्ण झाल्यानंतर त्यांना ASSISTANT ENGINEER-CLASS-1 पदोन्नती मिळाली. १९८७ मध्ये ते सिव्हील इंजीनियर्स कमिटी लंडनचे सन्माननीय सदस्य झाले. आणि सलग ५० वर्ष त्या पदावर राहिले. सन १९०८ मध्ये निवृत्त होण्याआधी त्यांनी कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता अशी उच्चे पदे भूषवली.



या कालवधीत त्यांनी मुंबई प्रांत व भारतात बऱ्याच प्रमुख शहरात पाणीपुरवठा योजना

**इंजी. श्री. के.आर.चौधरी**
**अध्यक्ष भारतरत्न सर विश्वेशरेया जेष्ठ नागरिक संघ धुळे व निवृत्त कार्यकारी अभियंता**

पूर्ण केल्या. उदा. धुळे, सुरत, पुणे, खडकी, नाशिक, धारवाड, विजापूर, बेळगाव, कोल्हापूर, अक्कलकोट, इंदोर ग्वाल्हेर, नागपूर, राजकोट, भावनगर, बडोदा, सांगली, वानकेनेर, मोरवी, पंढरपूर, भोपाल, अहमदनगर, गोवा, हैद्राबाद, इत्यादी. त्यांनी शेतीसाठी ब्लॉक व्यवस्था (BLOCK SYSTEM) चा विकास केला.

१९०८ मध्ये शासकीय सेवेतून निवृत्त झाल्या नंतर त्यांनी इटली, कोरिया, अमेरिका, कॅनेडा, स्वीडन, रशिया इत्यादी देशांना भेटी दिल्या.एप्रिल १९०९ मध्ये त्यांना हैद्राबाद संस्थांनने अभियांत्रिकी विशेष सल्लागार पदी नियुक्त केले.१९११ मध्ये त्यांना म्हैसूर संस्थांचे मुख्य अभियंता नियुक्त केले गेले. ततपश्चात १९१२ मध्ये ते म्हैसूर संस्थांन चे दिवाण म्हणून नियुक्त झाले. प्रसिद्ध कृष्णराज सागर धरण त्याच कालवधीत निर्मित झाले. त्याच कृष्णराज सागर धरण बद्दल महात्मा गांधी उद्गारले KRUSHNARAJ SAGAR IS ALONE OF THE LARGEST OF ITS KIND, IN THE WORLD, WILL PERPUTUATE THE NAME OF SIR VISHWESHARAIYA ते फक्त इंजीनीयर नव्हते, तर ते एक शेती तज्ञ, शिक्षण तज्ञ,उद्योगपती, लेखक आणि एक स्वास्थ्य विशेषज्ञ देखील होते.म्हणून ते १०२ वर्षाचे दीर्घ आयुष्य जगू शकले. ते प्रसिद्धी परामुख होते. ते म्हणायचे चांगले काम करा खूप काम करा इमानदारीने पैसा कमवा, कारण कर्म हीच पूजा आहे.


१९५५ मध्ये देशाचा सर्वोच्च सन्मान म्हणजे भारतरत्न हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. १९६०च्या १५ सप्टेंबर रोजी त्यांचा जन्मशताब्दी समारंभ तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय पातळीवर साजरा झाला.

२४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०२ व्या वर्षी त्यांनी देशसेवेत कार्यरत असताना आपला देह ठेवला. अश्या ऋषितुल्य जादुगार अभियंत्याला शतशः नमन

# सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेणारे प्रा. सूर्यकांत रहाळकर

**नाशिक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, अभिनव भारत संस्थेचे उपाध्यक्ष, स्काउट गाईड चळवळीचे अग्रणी व सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेणारे प्रा. सूर्यकांत रहाळकर यांचे (दि.१३) रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७३ व्या वर्षी निधन झाले. त्यांना भावपूर्ण आदरांजली....!**


साधारणपणे रहाळकर परिवार ३०० वर्षांपूर्वी नाशिकमध्ये स्थायिक झाला. पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या विश्वासास पात्र ठरल्याने त्यांना वाडा व जमीन इनाम म्हणून मिळाली. सूर्यकांत रहाळकर यांचे आजोबा विष्णू रावजी रहाळकर यांचा ज्योतिषशास्त्राचा दांडगा व्यासंग होता. ते ५ वर्षांचे पंचांग तयार करीत. कोणतीही निवडणूक न लढवता ते तब्बल ४० वर्षे नगरपालिका सदस्य होते. त्यांचे पुत्र रामचंद्र तथा काकासाहेब रहाळकर प्रख्यात वकील होते. खा. गो. ह. देशपांडे नाशिक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष असतांना काकासाहेबांनी उपाध्यक्षपद सांभाळले. त्यावेळी जुना पेशवेवाडा त्यांच्या अथक प्रयत्नांनी संस्थेला मिळाला. मुंबईच्या पेठे बंधू या प्रसिद्ध सराफी पेढीकडून २० हजार रुपयांची देणगी मिळवली. शाळेचे नाव पेठे विद्यालय झाले. काही काळ ते नाशिक नगरपालिकेचे अध्यक्ष होते. सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.अशा परिवारात १५ नोव्हेंबर १९५० रोजी सूर्यकांत यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण पेशवे वाडा व माध्यमिक शिक्षण पेठे विद्यालयात झाले. शाळेतील गुरुजनांच्या मार्गदर्शनाने त्यांच्यातील वक्तृत्व, बुद्धीचातुर्य, सभाधीटपणा या गुणांना झळाळी प्राप्त झाली. शालेय जीवनात चित्रकला हा विषय त्यांच्या विशेष आवडीचा होता. त्यात त्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन पारितोषिके मिळवली. गणेशमूर्ती तयार करण्याचाही त्यांना छंद होता. त्यांनी तयार केलेल्या मूर्तीची त्यांच्या घरी प्रतिष्ठापना करण्यात येईल. शाळेतच विद्यार्थी संघटन करून नेतृत्व करण्याची आवड निर्माण झाली. त्यासाठी सामाजिक कार्याचे बाळकडू घरातूनच मिळत होते. वाचन, लेखन यांच्या संस्काराबरोबरच अध्यात्मिक वारसाही त्यांना घरूनच मिळाला. वाढत्या वयाबरोबर जनसंपर्क वाढला. सामाजिक कार्याच्या कक्षा रुंदावल्या. गोखले एज्युकेशन सोसायटीच्या आर.वाय के. महाविद्यालयातून त्यांनी बी.एस्सी. पदवी मिळवली. युथ न्यूज नावाचे मासिक ते चालवायचे. नंतर ते एमबीए झाले. विविध वृत्तपत्रात अभ्यासपूर्ण लेख लिहू लागले. पुढे जेथे उच्चशिक्षण घेतले त्याच संस्थेच्या एच. पी.टी. महाविद्यालयात ते प्राध्यापक झाले व मार्केटिंग विषय शिकवू लागले. पीपल्स को. ऑप. बँकेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम केले. लोकमान्य टिळकांचे नातू डॉ. केतकर यांच्याशी भेट झाल्यावर त्यांनी सूर्यकांत यांचे नेतृत्वगुण हेरले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्थापन केलेल्या अभिनव भारत संघटनेची धुरा त्यांच्यावर सोपवली. अखेरपर्यंत त्यांचे कार्य सुरु होते.



**संजय देवधर**
**(माजी विद्यार्थी व वरिष्ठ पत्रकार)**
**मो. ९४२२२७२७५५**

नाशिकमधील चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक मर्चंट्स को.ऑप बँक, सारस्वत बँक, विश्वास बँक, जनलक्ष्मी बँक सिद्धिविनायक पतसंस्था यांचे संचालक, सदस्य, मार्गदर्शक म्हणूनही त्यांनी आपल्या कार्याचा, जनसेवेचा ठसा उमटवला. रविवार कारंजा मित्रमंडळाची स्थापना व चांदीच्या गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना यात त्यांचा पुढाकार होता. नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईन्ड, रेड क्रॉस सेवाभावी संस्था यांच्याशी देखील ते अनेक वर्ष जोडलेले होते. १९८४ ते १९९९ पर्यंत ना.ए. सोसायटीचे ते उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यानंतर अध्यक्ष झाले ते अखेरच्या क्षणापर्यंत. सुमारे ४० वर्षे त्यांनी संस्थेचे नेतृत्व केले. अनेकविध योजना राबवून संस्था पुढे नेली. आदिवासी भागात वेळुंजे येथे आश्रमशाळा सुरु केली. संस्थेच्या विकासासाठी निधीसंकलन केले. विविध कंपन्यांचा

सी.एस.आर. फंड मिळवला. पाणी बचत मोहीम राबवून जलसाहित्य संमेलन भरवले. संस्थेच्या शताब्दी वर्षात नामवंत माजी विद्यार्थ्यांना शाळेत सन्मानाने बोलावून त्यांची उद्बोधक भाषणांची श्रुंखला निर्माण केली. मलाही वारली कलेविषयी बोलण्याची संधी दिली. सूर्यकांत रहाळकर यांच्या पत्नी स्नेहल रहाळकर गणित प्राध्यापिका म्हणून परिचित आहेत. पुत्र किरण हे वन्यजीव संवर्धनाच्या क्षेत्रात अग्रणी आहेत.




## सोभाव (सुत्र ८)
## मानवनं खरं जीवन

सोतानी बुध्दी वापरीसन ईचार करा.

मानूसना सोभाव हाऊ जन्मसिद्ध -हास असा समज हाऊ त्याना अज्ञानना भ्रम शे.तसाच तो सोभाव निर्मितीना काममा बी खूप तरासदायक शे. या समजना एवढाच घातक आत्मविनाश असं दुसरं काहीबी नै.त्यापरमाने प्रकृतीनी बेजबाबदारी म्हना की हयगय म्हना हायी धाकलपनपाईनच चालत येयेल शे. हाई मानूसनी चाल शे. त्याना वाईट परिनाम म्हन्जे परिनाम म्हन्जे शरीरधर्मना समद्या सवयी बिघडतीस आनी उभं आयुष्य नाशी जास. या गोष्टीसना वाईट परिनाम मानूसना सोभाववर व्हऊ लागस मंग तो आयधी, निरुत्साही, कामटायनारा मनपासून काम करानी ताकद नसनारा असा हातमातलं काम कधय सरी आनी आपून कधय मोक्या व्हसूत असा व्हत जास. आठे मनना काम दिसतं तरी तो त्याले शरीरसोस्थना परिनाम दिखथस.म्हनीसन ज्यानी सोताना सोभाव तयार कराना निश्चय करा त्यानी पयले देहधर्मनं नित्यनियमित कराना आनी चांगलं आरोग्य प्राप्त आनी ते दीर्घ काल टिकाडाना पयले प्रयत्न करनं अंत्यंत महत्वानी शे. शरीर देहनी अशुद्धी म्हन्जे मनना खंबीरपना नाहीसा करस.मनले डाग लागस.त्यानामुये मानूसन्या ज्या चांगल्या भावना आनी चांगला ईचार ह्या निष्फय ठरतस.रोग देहले लागस पन आपून तो आपला सोभाव म्हाईन व्यक्त करतस. तव्हय सोभाव हाऊ जन्मसिद्ध -हास असा मानूसले मनपासून वाटाले लागस. हाई दुसरं खरं कारन.देहधर्म धड चांगल नसनं हाईच व्हस.मननी प्रसन्नताजशी देहनी कांती रंग वाढावस.मानूसना चेहरावर एक परकारनं तेज आनस.त्यापरमाने देहनी घान बी वर सांगापरमाने प्रकट व्हस -हास.आनी त्यालेच अज्ञानना सोभाव असं म्हनतस असंच समाजमा समजाले लागतस.पनहाऊ सोभाव मनन्या सवयी आनी देहन्या सवयी यासन्या प्रेर्यप्रेरक संबांधम्हाईन निरमान होना-याला ज्याले आपून सोभाव म्हनेल शे तो खरा सोभाव -हात नै. ते तो एक परकाना देहना रोगच मनवर व्यक्त व्हस.नै ते फुटत -हासम्हनीसन आरोग्यार्थ खबरदारी लेवाले जोयजे नै ते तो नाहीसा व्हई जास देहधर्म आनी आरोग्य वा पडसाकडे जर दुर्लक्ष कर ते फक्त मानसिक संस्कारनं नै ते बौध्दिक ईचारन हाऊ सोभाव कायी सुधारता येत नै.मनना खंबीरपना हाऊ खरा गुन पहिले पायनामा ज्या गाना आयकेल -हातह आनी पुढे देहशौचान जनमले येस आनी वाढत जास.आज समाजमा या दोन्ही गोष्टीसनी जशी कमतरता दिखायी देस तशीच खंबरी मनन्या मिनूसलेबी दुष्काय सारख्या वाटाले लागतीस. हाऊ त्याले प्रत्यय येस.मनना खंबीरपना कोल्हा उपदेश करीसन निरमान व्हत नै. त्याले वरन्या समद्या गोष्टीच आवश्यक शेतीस. पुढे -पुढे पडसाकडे जावं चांगलं साफ पडसाकडे व्हन हाई आपूनना हातनी गोट -हास पन हाई समदं गावं नै ते दुसरंआस गान ऐकनं परसोधीन म्हन्जे दुसरांवर अवलंबून -हास हाई गोट शे. म्हनीसन ज्याले सोताना सोभाव बनाडाना शे त्यानी आपलाफान ज्यि गोष्टी शेतीस त्यानाच ईचार करो.परकानी बुध्दी वापरानी गरज नै.इपुलीच बुद्धी वापरानी हाऊ ईचार ठेवा हाई खरंशे.

**- प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**

## शब्दकोडे-१७९



**आडवे शब्द**

१. बिनविषारी महासर्प ३. कायमचे स्थान ६. कुंतीचे दोन पराक्रमी पुत्र १०. किंमत ११. दार १३. संगीतातील एक राग १४. आमने सामने १७. वजन १८. लाकडाची एक उत्कृष्ट जात १९. हिंदीत खत २०. बहुमोल २२. हाट २३. कमळ २५. रममाण २७. कोवळी फांदी २८. मोठा हातोडा २९. लक्ष्मीचे एक नाव ३१. मागणी, विनंती ३२. प्रतिष्ठेचा अवयव ३४. अव्यवस्थितपणा ३६. जेमतेम ३८. मन, विचार ४०. शिखराचे टोक ४१. ओले खोबरे ४२. शेतातील आयुध ४४. पाणी ४५. दणकट ४७. डाळीचे कालवण ४८. वस्ती ५०. आदरातिथ्य ५२. बैलाच्या गळ्यात बांधण्याचा दौर ५४. एक गड्डा भाजी ५७. रूक्ष ५८. युद्ध ५९. गायीचे पिल्लू ६१. कर्ण ६२. वर्दळ, गर्दी ६३. बूड ६४. किंमतीतील वृद्धी ६६. पुष्परस ६७. मगज, फळातील खाद्यभाग ६९. गुप्त हस्तक ७०. सापाची एक जात ७२. बाजेची कापडी पट्टी ७५. कापडाचा एक जाडाभरडा प्रकार ७६. मत देणे ७७. मलई ७८. रविवासर ७९. साह्य

**उभे शब्द**

१. अमावस्या २. फुलांची माळ ३. मृत्यु नसलेला ४. दुसऱ्यासाठी खर्च करणे ५. मूल्य ६. गबाळा ७. नजरफेक ८. महाभारतातील शक्तीशाली गदाधर ९. इच्छा दडपून टाकणे (वाक्प्रचार) १०. श्रीकृष्णाचे एक नाव १२. तुळई १५. आकर्षक १६. श्रीकृष्णाचे द्रौपदीशी नाते १७. अवधान, लक्ष २१. छोटासा २३. राष्ट्रगीतातील पहिले राज्य २४. धाक, भीती २६. सिद्धता २८. ढग, दाट ३०. घरातील मधली खोली ३२. मत्स्य, मीन ३३. गप्प बसणे ३५. पशू, श्वापद ३६. कौशल्य ३९. टोळीचा प्रमुख ४०. भांडण ४२. आगमन, प्रकट होणे ४६. माहितगार ४८. मिरवत नेणे ४९. सर्वस्व ५१. एक पालेभाजी ५३. मैत्रिण ५५. नवरदेव ५६. प्रचंड, आरडाओरड ५९. परिणाम कारक (हिंदी) ६०. अस्थिर ६४. हिंदुस्थान ६५. बटु अवतार ६८. ठराविक पैसे ६९. सुवर्ण ७१. पृथ्वी ७३. घाव, प्रहार ७४. सूर्याचे एक नाव ७५. शंकर

### शब्दकोडे १७८ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.नफा नुकसान ५.कसरत ८.समर ११.वाट १२.रखरखीत १३.अकारण १४.कपट १६.नराधम १८.गाल २१.कणीदार २३.तन २५.सम २६.पाडाव २७.सवड २९अ.भडंग ३०.पाव ३१.गणेश ३३.प्रवाळ ३४.रसवान ३६.मळ ३७.हत्याकांड ३८.मधुबाला ४०.दाणेदार ४२.सण ४३.आडवा ४५.ससा ४७.वाम ४८.गदा ४९.पंडित जवाहरलाल नेहरू ५३.समरस ५५.तर ५६.सजवा ५७.मना ५८.दमा ६०.बेकार ६२.नजर ७१.सावज ८०.खनन ८१.पात ८२.का ८३.मज ८४.रोज ८५.रामरस ८६.खेटर

**उभे उत्तर**

१.नवा २.फाटक ३.कलाटणी ४.नरवर ५.करवत ६.सखी ७.रतन ८.सकाम ९.मर १०.रणगाडा १३.अधम १५.पकडणे १७.रासगरबा १९.लवकर २०.वेस २२.दास २४.नभ २६.पावन २८.वगळणे २९.सवड ३०.पावा ३२.शहर ३३.प्रकांड पंडित ३५.सलाम ३६.मदार ३८.मण ३९.कंड ४१.दावेदार ४२.सरोज ४३.आमने ४४.वासरू ४५.सहज ४६.सारवान ४७.वाल ४८.गम नागमन ५०.तरबेज ५१.वासर ५२.हरकत ५३.सम ५४.सदरा ५९.माजघर ६१.कापा ६३.जनमानस ६४.रव ६८.कान ७०.नीर ७३.खाजरा ७४.साखर ७५.नंतर ७७.रम ७८.वीज ७९.साज ८१.पाट

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### जिपच्या शिक्षक भरती प्रक्रियेस सुरवात

**नाशिक ।** राज्य शिक्षण आयुकतांच्या सुचनेनुसार नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत पेसा क्षेत्रातील शिक्षक भरती प्रक्रियेस सुरवात झाली आहे. राज्य स्तरावरून प्राप्त गुणवत्ता यादीतील पेपर २- इयत्ता ६ वी ते ८ वी साठी अनुक्रमणिका १ ते २०० उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी शनिवार (दि. १६ ) रोजी सकाळी १०.३० ते ६ वेळेत शासकीय माध्यमिक कन्या विद्यालय, नाशिक येथे होणार आहे. इयत्ता १ ली ते ५ वी साठी पेपर - १ साठी १ ते ३०० उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी सोमवार (दि.१८) रोजी सकाळी १०-३० ते ६ या वेळेत शासकीय माध्यमिक कन्या विद्यालय, नाशिक येथे होणार आहे. गुणवत्ता यादी व कागदपत्रे पडताळणी वेळापत्रक नाशिक जिल्हा परिषदेच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

### चालकांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन

**नाशिक ।** नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने दरवर्षी १७ सप्टेंबर विश्वकर्मा जयंती व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन हा 'चालक दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. यंदाच्या वर्षी देखील संस्थेच्या वतीने रविवार दि.१७ सप्टेंबर सकाळी १० वाजता लक्ष्मीनारायण बँक्वेट हॉल, एचपी गुरूनानक पेट्रोल पंपासमोर, डीमार्ट मॉल सर्व्हिस रोड, कोणार्कनगर, आडगाव शिवार, नाशिक येथे चालक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# भाजपची जम्बो शहर कार्यकारणी जाहीर

### माजी नगरसेवकाना संघटनेत महत्वाची जबाबदारी

**नाशिक । प्रतिनिधी**








भाजप शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी पहिली शहर कार्यकारणी जाहीर केली आहे. महापालिका निवडणुका नसल्यामुळे माजी नगरसेकांना संघटनेत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या दिल्याने तसेच काही पदांवर घराणेशाहीला पुरस्कृत केल्याने सामान्य भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते अस्वस्थ झाले आहेत.

कार्यकारिणीत शहर उपाध्यक्षपदी पवन भगुरकर (मिडीया प्रभारी), जगन पाटील, सतिश सोनवणे, सुनिल देसाई, देवदत्त जोशी, अजिंक्य साने, सुनिल खोडे, संध्या कुलकर्णी, सुनिल फरांदे, प्रा.कुणाल वाघ, ड.मिनल भोसले, निलेश बोरा, निखील पवार, धनंजय माने, गणेश बोलकर आदींची तर सरचिटणीस - सुनिल केदार, काशिनाथ (नाना) शिलेदार, ड. श्याम बडोदे, हिमगौरी आडके-आहेर, रोहिणी वानखेडे-नायडू यांनी संधी देण्यात आली आहे.

चिटणीसपदी बाजीराव भागवत, सोमनाथ बोडके, सुजाता जोशी, सुरेखा निकम, प्रा. शरद मोरे, अमित घुगे, तुषार जोशी, प्रथमेश कोशिरे, ज्योती कुवर, ड. महेंद्र शिंदे, संजय राऊत, नारायण जाधव, हेमंत शुक्ल, सुनिल फरताळे, शामराव पिंपरकर. कोषाध्यक्ष आशिष नहार, कार्यालयीन चिटणीस अरूण शेंदुर्णीकर, युवा मोर्चा शहराध्यक्ष सागर शेलार, महिला मोर्चा - सोनाली ठाकरे, अनुसुचित जाती मोर्चा - राकेश दोंदे, आदिवासी मोर्चा - राजेंद्र राजवाडे, किसान मोर्चा - बापुराव पिंगळे, अल्पसंख्यांक मोर्चा - आरिफ काजी, ओबीसी मोर्चा - अजय आघाव, कामगार आघाडी - हेमंत नेहेते, उत्तर भारतीय आघाडी - प्रकाश चौहान, उदयोग आघाडी - सतीश कोठारी, व्यापारी आघाडी - राघवेंद्र जोशी, भटके-विमुक्त आघाडी - सिध्देश्वर (बापु) शिंदे, अध्यात्मिक समन्वय प्रकोष्ठ मेघश्याम (महाराज) निकम, जैन प्रकोष्ठ - मुकेश जैन, पदवीधर प्रकोष्ठ - विनोद खरोटे, राजस्थान प्रकोष्ठ - नितिन कोचर, चित्रपट प्रकोष्ठ - रवी जन्नावर, वैद्यकिय सेल - डॉ.भालचंद्र ठाकरे, कायदा सेल - ड.शलाका पाटील, सहकार सेल - प्रफुल्ल संचेती, माजी सैनिक सेल - दिनकर पवार, ज्येष्ठ कार्यकर्ता सेल - नरेंद्र सोनवणे, दिव्यांग सेल - विनायक कस्तुरे, ट्रान्सपोर्ट सेल - अमोल शेळके, दक्षिण भारतीय सेल - अनुप पुष्पांगथण, शिक्षक सेल - उदय सोनवणे, क्रीडा प्रकोष्ठ - संजय पाटील, बुध्दीजीवी सेल - ड. श्रीधर व्यवहारे, सांस्कृतिक सेल - राहुल (महाराज) साळुंके, आयुष्यमान भारत सेल - डॉ. वैभव जोशी, बेटी बचाओ- बेटी पढाओ सेल - सुरेखा पेखळे, आय. टी.सेल - ऐश्वर्य जुन्नरे, सोशल मिडिया - ऋषिकेश डापसे, पंचायत राज व ग्रामविकास - ज्ञानेश्वर पिंगळे, प्रसिध्दी प्रमुख - राहुल कुलकर्णी, गुजराथी सेल - विपूल मेहता, पर्यटन विकास मंच - नंदकुमार देसाई, पर्यावरण मंच - उदय थोरात, तिर्थक्षेत्र आघाडी - कल्पेश दिक्षीत, अंत्योदय सेल - डॉ. हर्षा फिरोदिया, योग प्रकोष्ट - डॉ. प्रिती त्रिवेदी, कार्यकारिणी सदस्य - राजेंद्र देशमुख, ठा.भुवाल सिंह, दिगंबर धुमाळ, संजय चव्हाण, सुहास शुक्ल, हेमंत शुक्ल, शाम क्षीरसागर, कांता वराडे, प्रभा पारगावकर, अल्ताफ शेख, अन्नपूर्णा तांबोळी, रविंद्र डावखर, नंदकुमार गोखले, खंडेराव पाटील, संजय संघवी, कैलास वैशंपायन, विजय घोडके, सुचेता कुकडे, स्मिता शिंदे, राम काळे, हरिभाऊ जाधव, राजश्री शौचे, युनूस सय्यद, प्रकाश दिक्षित, प्रेरणा बेळे, संतोष भोर, अजित ताडगे, मनोहर आव्हाड, निवृत्ती कातकाडे, सुरेश दराडे, शैलेश शिमगेकर - भावसार, प्रियंका कानडे, महेंद्र गर्गे, शिवाजी शहाणे, रामदास पिंगळे, वाळू काकड, शंकरराव पिंगळे, ज्ञानेश्वर (अण्णा) आढाव, राम वाघ, निवृत्ती भोर, विलास मुळाणे, मिथुन परदेशी, गुलाब सय्यद, हेमेंद्र पटेल, नवनाथ पारखे, डॉ.केतन औसरकर, दिलीप देवांग, वासंती जावळे, मनोज तांबे, विवेक तरटे, श्रीकांत खांदवे, बाळासाहेब पालवे, करुणा गायकवाड, बबलुसिंह परदेशी, शंकरसिंह गेहलोत, स्नेहा खांदवे, शोभा जाधव, नितीन ठाकरे, राजु करमासे, धनंजय बेलगांवकर, राजेंद्र बाफणा, नंदकुमार उदावंत, वामनराव दातीर, धर्माजी बोडके, दिपक पाटील, सुरेश देशमुख आदींची निवड करण्यात आली आहे.

#### एकनिष्ठ कार्यकर्त्यांवर अन्याय झाल्याची भावना

**अनेक इच्छुकांची नूतन कार्यकारिणीत वर्णी लागली नाही. शहर अध्यक्षाचा नेमके कोणाला खूष करण्याचा प्रयत्न आहे? असा सवाल केला जात आहे. एकनिष्ठ कार्यकर्त्यांवर अन्याय झाल्याची भावना देखील व्यक्त होत आहे. त्यामुळे स्थानिक आमदार, पदाधिकारी पासून ते मुंबईतील नेत्यांकडे देखील फिल्डींग लावण्यास प्रारंभ केला आहे. त्यामुळे कार्यकारिणीत काहिसे फेरबदल होण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे.**

**कार्यकारिणी निश्चित करतांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ.चंदशेखर बावनकुळे, ना.गिरीश महाजन, प्रदेश महामंत्री विजय चौधरी, संघटन मंत्री रवी अनासपुरे, आ.राहुल ढिकले, आ.देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, प्रदिप पेशकार, बाळासाहेब सानप, विजय साने, सतिष कुलकर्णी आदी वरिष्ठ नेत्यांची चर्चा व विचार विनिमय केला होता. सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. - प्रशांत जाधव, शहराध्यक्ष**

# मुल्य पाळून मिळालेल्या यशातूनच सुखाची प्राप्ती- प्रा. धनवटे

**नाशिक । प्रतिनिधी**

जीवन मूल्य आत्मसात करून यश मिळवता येते. मिळालेल्या यशातून सुखी आयुष्याकडे वाटचाल करता येते. त्यासाठी भारतीय सांस्कृतिक जीवनात सांगितलेल्या मूल्यांची जोपासना करा, असे आवाहन प्रा. साहेबराव धनवटे यांनी केले. ते एकलहरे येथील मातोश्री औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयाच्या 'इंडक्शन प्रोग्राम' अंतर्गत बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. गोकुळ तळेले, कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. प्रितम डुबे, प्रा. सुरेखा पाटील , प्रा. श्वेता झाल्टे आदी उपस्थित होते. धनवटे म्हणाले की, सध्याच्या जगात मूल्यशिक्षण महत्त्वाचे झाले असून, यश मिळवताना मूल्य टिकवून पुढे जाणे व्यापक समाजाच्या हिताचे आहे. सत्य, सातत्य, सहनशीलता, निष्ठा अशा अनेक मौलिक गुणांतून चांगला माणूस घडतो. या माणसांकडून चांगले चिंतन होते, म्हणून अशा गोष्टींचा लोकसंग्रह विद्यार्थी अवस्थेपासूनच केला पाहिजे. आरोग्य जोपासना, उत्तम व्यवहारातून अर्थार्जन करून ते पुन्हा समाजासाठी कामी आणणे यातून सुखाचा शोध लागू शकतो. व्यक्तीपरत्वे सुखाच्या कल्पना भिन्न असल्या तरीही किमान नैतिक अधिष्ठान असलेला जगण्याचा आनंद घेता येणे म्हणजेच सुख, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

दरम्यान मंगळवारपासून बीफार्म आणि डीफार्मच्या (औषधनिर्माण शास्त्र पदवी आणि पदविका) विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम सुरू करण्यात आला. त्याअंतर्गत देवळाली येथील आर्टिलरी सेंटरला भेट देण्यात आली. प्रा. श्रद्धा भावसार, विदयार्थी प्रतिनिधी अनिकेत परळीकर, सचिन जंगले यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. आकांक्षा साळवे यांनी सूत्रसंचालन केले, तर रसिका सोनावणे यांनी आभार मानले.

# नवजात शिशु तज्ञ संघटनेच्या राज्य अध्यक्षपदी डॉ. संजय आहेर



**नाशिक ।** येथील प्रख्यात नवजात शिशु तज्ञ व निओकेअर हॉस्पिटलचे संचालक डॉ. संजय आहेर यांची महाराष्ट्र राज्य नवजात शिशु तज्ञ संघटनेच्या राज्य अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांचा कालावधी पुढील दोन वर्षाचा राहणार आहे.

नाशिक जिल्ह्यातील चांदोरी या ग्रामीण भागात जन्मलेल्या डॉ. आहेर यांनी शालेय शिक्षण तेथेच घेऊन मग पदव्युत्तर अभ्यास परदेशात पूर्ण केला. तसेच परदेशातील नामवंत हॉस्पिटलमध्ये कार्य केले. परदेशात अनेक संधी असूनही आपल्या ज्ञानाचा लाभ देशाला होण्यासाठी त्यांनी सुमारे पंधरा वर्षांपूर्वी नाशिक येथे निओकेअर हॉस्पिटलची स्थापना केली. त्यांच्या या निवडीबाबत त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# मेट, मीना भुजबळ नॉलेज स्कूलमध्ये पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याची कार्यशाळा

**नाशिक । प्रतिनिधी**



मेट, मीना भुजबळ नॉलेज स्कूल ऑफ एक्सलन्स येथे पर्यावरणपूरक गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या वर्कशॉपला सर्व विद्यार्थिनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन, गणेश मूर्ती बनवण्याचा आनंद घेतला.

गणपतीच्या आगमनाला केवळ काही दिवसच बाकी असतांना, सर्वत्र आनंदी वातावरण दिसत आहे. हेच निमित्त साधून मेट, येथील मीना भुजबळ स्कूल ऑफ एक्सलन्स शाळेत 'गणपती मूर्ती मेकिंग ' ही कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेमार्फत कलाशिक्षक दीपक गरुड यांनी पर्यावरणपूरक असे शाडूच्या मातीचे गणपतीच का? याविषयी माहिती देऊन प्रबोधन केले. यासाठी शाळेच्या प्राचार्य, सर्व शिक्षक, आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# धात्रक फाटा येथील नर्मदेश्वर महादेव मंदिरात कावड यात्रा

**नाशिक ।** श्रावण महिन्यातील चारही सोमवारी गंगा गोदावरी मातेचे जल पहाटे कावडीने आणून भगवान नर्मदेश्वर महादेवाला जलाभिषेक करण्यात आला.

दर सोमवारी धात्रक फाटा येथील लोकमान्य हॉस्पिटल ते नर्मदेश्वर महादेव मंदिरापर्यंत गंगामैयाचे जल व कावड यात्रेचे टाळ मृदंगाच्या गजरामध्ये स्वागत करण्यात आले. यावेळी मिरवणूक काढण्यात आली. ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषामध्ये नर्मदेश्वर महादेवाला जलाभिषेक करण्यात आला. नाशिक जिल्हा तसेच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये चांगली पर्जन्यवृष्टी व्हावी यासाठीही नर्मदेश्वर महादेवाला साकडे घालण्यात आले. याप्रसंगी ओम नर्मदेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी संजय गोडसे, दत्तात्रय गावित, सोमनाथ पेखळे, अजय खोकले, खंडेराव भवर, गजानन जगताप, रमेश बोराडे, दिगंबर पाटील, अमित पाटील, बाळासाहेब सादडे, खैरनार साहेब, परिसरातील वारकरी व महिला भक्त मंडळ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# रचनाच्या चिमुकल्यांनी साकारले शाडू मातीचे गणपती



**सिडको । प्रतिनिधी**

येथील महाराष्ट्र समाज सेवा संघ संचालित रचना माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरकता जोपासावी, इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करावा याचा एक भाग म्हणून शाडू माती पासून गणपती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली. गणेशोत्सवाचे बदलते स्वरूप लक्षात घेऊन पीओपीचा वाढता वापर पर्यावरणास घातक ठरत आहे. यास पर्याय म्हणून शाडू माती, पानाफुलांचा पर्यावरण स्नेही गणेशोत्सव साजरा करावा या उद्देशाने रचना इको क्लब व रचना आर्ट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने येथील एस. एम. जोशी सभागृहाच्या प्रांगणात जवळपास १५० विद्यार्थ्यांच्या सहभागाने कार्यशाळा संपन्न झाली.

विद्यार्थी नैसर्गिक रंग वापरून मूर्तीला रंग देऊन याच गणपतीची आपापल्या घरी स्थापना करतील. या कार्यशाळेस महाराष्ट्र समाज सेवा संघ संस्थेचे अध्यक्ष सुधाकर साळी, उपाध्यक्षा हेमा पटवर्धन, सचिव शांताराम अहिरे, सहसचिव पंकज पवार, कोषाध्यक्ष निरंजन ओक, कार्यकारणी सदस्य मधुकर फटांगरे, यशवंत ठोके, निलेश ठाकूर, कीर्ती सावंत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संगीता टाकळकर, पर्यवेक्षक शिवदास महाजन यांनी कार्यशाळेस भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

विद्यार्थ्यांनी घरगुती गणपती सजावट करताना प्लास्टिक, थर्माकोल व जास्तीची लाइटिंग न वापरता पर्यावरण पूरक सजावट करावी असे आवाहन सुधाकर साळी यांनी केले. कलाशिक्षक संतोष मासाळ यांनी विद्यार्थ्यांना मूर्ती बनवण्यासाठी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संयोजन रचना इको क्लबच्या प्रमुख वैशाली कुलकर्णी, नयना हिरे यांनी केले.

# केटीएचएम महाविद्यालयात पर्यावरणपूरक गणपती कार्यशाळा

**नाशिक । प्रतिनिधी**

**केटीएचएम महाविद्यालयाच्या बी व्होक इंटेरीअर विभागाच्या वतीने महाविद्यालयात एको फ्रेंडली गणपती बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर यांच्या हस्ते करण्यात आले.**



यावेळी डॉ. बी. डी. भारस्कर, बी व्होक नोडल ऑफिसर डॉ. एन. डी. गायकवाड, विभागप्रमुख आर्की. सपना पाळेकर उपस्थित होते. यावेळी बोलतांना डॉ. दरेकर यांनी कोणताही सण साजरा करतांना पर्यावरणाची हानी होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच गणपती उत्सवात देखील विद्यार्थ्यांनी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी प्रयत्न करावे व जास्तीत जास्त निसर्गाचा समतोल ठेवावा असे आवाहन केले.

गणपती मूर्ती तयार करण्यासाठी यावेळी संस्थेच्या ललितकला महाविद्यालयाचे विद्यार्थी समाधान गांगोडे व सहकाऱ्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने समजावून सांगितले. प्रास्ताविक व आभार चित्रा कुलकर्णी यांनी मानले. कार्यशाळा सुरळीत पार पाडण्यासाठी प्राजक्ता मोगल, आर्की. प्रांजली देवरे, भरत आहेर यांनी प्रयत्न केले.

प्रोसेस जमा **ॲड. दिपराज एम. पाटील**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि.अर्ज क्र.२५६/२०२३**

चंद्रकला वसंत सोमवंशी
उ. व. ७६ धंदा-घरकाम
रा. दुसाणे ता. साक्री जि.धुळे .....अर्जदार
।। विरुद्ध ।।
कोणीही नाही ..... जाबदेणार

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेम्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दिनांक ०९/०८/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. वसंत धर्मा सोमवंशी यांचे दिनांक ११/०७/२०२३ रोजी निधन झाले आहे मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१) श्रीमती चंद्रकला वसंत सोमवंशी (पत्नी)
२ ) श्री. कल्याण वसंत सोमवंशी (मुलगा)
३) श्री. सतीश वसंत सोमवंशी (मुलगा)

मयतास वरील प्रमाणे वारस असून, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसाव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात दिनांक ७/१०/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस नोटीस मे न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिद्धी दिली असे

स्थळ :- साक्री
दिनांक : १४/०७/२०२३

(शिक्का)

**कामगिरी लिपिक**
**दिवाणी न्यायालय क .स्तर, साक्री**

**सहा.अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय क .स्तर, साक्री**

## न्यूज कॉलम

### किंडरगार्टेन स्कूलतर्फे रविवारी बालशिबिर

**धुळे ।** शहरातील कृष्णचैतन्य किंडरगार्टेन स्कूलतर्फे गणेशोत्सव अथर्वोत्सव बालशिबिर आयोजित करण्यात आले आहे. रविवारी (दि.१७) दुपारी ४ ते ७ या वेळेत वाडीभोकर रोड परिमल कॉलनीतील कृष्णचैतन्य किंडरगार्टेन स्कूलमध्ये शिबिर होणार आहे. शिबिरात दोन गट असतील. शिबिरात पंचतत्वापासून नैसर्गिक गणपती मूर्ती तयार करणे, गणपती स्रोत, गोष्टी, आर्ट आणि क्राफ्ट तसेच पालकांसाठी कार्यशाळा असणार आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत आपली नावनोंदणी कृष्णचैतन्य किंडरगार्टेन स्कूलमध्ये तेजस्विनी कुळकर्णी किंवा स्नेहबंध कार्यालय, ग.नं.८, सुभाष नगर, जुने धुळे येथे संपर्क साधावा, असे कळवले आहे.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण ; गुन्हा दाखल

**धुळे ।** देवपुरातील चंदननगर परिसरातून १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली आहे. शोध घेऊन देखील ती मिळून आली नाही. अज्ञात व्यक्तीने तिला काही तरी आमिष दाखवून अपहरण केले, अशी तक्रार पीडित मुलीच्या आईने दिली आहे. त्यावरून देवपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शांतता समित्यांच्या बैठका : सण-उत्सवांत सलोखा, शांतता ठेवणार

## साक्री येथे शांतता समितीची बैठक संपन्न




**साक्री । प्रतिनिधी**

येथील तहसील कार्यालयातील शाहू राजे सभागृहात तालुक्यातील सर्वच हिंदू मुस्लिम गणेश उत्सवाचे आयोजक प्रतिष्ठित नागरिक आणि शांतता समितीचे सदस्य यांची बैठक तहसीलदार साहेबराव सोनवणे, उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे, नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी दीपक पाटील, पोलीस निरीक्षक मोतीराम निकम, माजी खासदार बापू चौरे यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

शांतता समितीच्या बैठकीस हजर असलेल्या गणेशोत्सवाचे आयोजक आणि मुस्लिम बांधव यांनी श्री ची स्थापना व दहा दिवस सुरू असणारा उत्सव, लक्षात घेऊन ईद ए मिलाद २९ सप्टेंबरला साजरा करणार असल्याचे मुस्लिम बांधवांनी जाहीर केले. या बैठकिस हिंदू समाजाचे पदाधिकारी ,मशिदीचे मौलाना यांनी अधिकाऱ्यांना या बदलाबाबत माहिती दिली. या बैठकीत हिंदू मुस्लिम शांतता समितीच्या सदस्यांनी व प्रतिष्ठित नागरिकांनी आपले मनोगत व्यक्त करून दोन्ही



सण शांततेत आणि उत्साहात साजरे करू अशी ग्वाही पोलीस व महसूल प्रशासनाला दिली.

यावेळी बोलताना ग्रामीण भागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे म्हणाले की साक्री तालुक्यातील हिंदू मुस्लिम समाजाने शांतता कमेटी च्या बैठकीला येऊन यकोप्या चा संदेश दिला आहे. अनंत चतुर्दशीला आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिल्यानंतर २९ तारखेला ईद-ए-मिलाद साजरा करण्याबाबतचा निर्णयाचे अभिनंदन आहे. श्रींच्या मिरवणुकीचे नियोजन तसेच प्रेरणादायी सांस्कृतिक सामाजिक आणि तालुक्याला प्रेरणा मिळेल असा संदेश देत गणेश उत्सव तसेच ईद-ए-मिलाद उत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. गणरायांची मिरवणूक शांततेत व वेळेत काढावी सूचनांचे पालन करावे नाहीतर त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला जाईल अशा इशारा विभागीय पोलीस उप अधिकारी साजन सोनवणे यांनी दिला.

यावेळी शांतता कमिटीच्या बैठकीस नगरसेवक पंकज मराठे, विजय भोसले प्रा. नरेंद्र तोरवणे, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष भानुदास गांगुर्डे, भाजपाचे शैलेंद्र आजगे वेडू सोनवणे, विनोद पगारिया, बंडू गीते, किशोर वाघ, धनंजय सोनवणे, आरिफ पठाण, जी.टी. मोहिते, शब्बीर शहा, बाबूदिन सय्यद, सुरेश शेवाळे, गणेश गावित आदींसह ग्रामीण भागातील पोलीस पाटील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार पोलीस निरीक्षक मोतीराम निकम यांनी मानले.

## कायदा-सुव्यवस्था राखा : सचिन हिरे



**शिंदखेडा । प्रतिनिधी**

गौरी गणेशाचे आगमन व ईद निमित्त शिंदखेडा पोलीस ठाणे येथे शांतता समितीची बैठक संपन्न झाली.

यावेळी तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळे पोलीस उपविभागीय अधिकारी सचिन हिरे, नगरपंचायत प्रशासक प्रशांत बिडगर,प्रशासकीय अधिकारी प्रल्हाद देवरे,पोलिस निरीक्षक दीपक पाटील, महावितरण कंपनीचे अभियंता तीनखेडे मंचावर उपस्थित होते. अनंत चतुर्दशी व ईद-ए-मिलाद हे दोघेही हिंदू मुस्लिम बांधवांचे सण व उत्सव एकाच दिवशी येत असल्यामुळे शांतता समितीच्या बैठकीत दि२९ रोजी मुस्लिम बांधव ईद-ए-मिलाद साजरा करणार असून २८ रोजी अनंत चतुर्दशी दिवशी हिंदू बांधव गौरी गणेशाची विसर्जन करणार असल्याचे एकमत झाल्याने दोघी सण एकोप्याने सामंजस्याने साजरे होणार असल्याचे पोलीस उपविभागीय अधिकारी सचिन हिरे यांनी सांगितले.

मोहम्मद पैगंबर जयंती २९ सप्टेंबर ला साजरी करण्यात येईल असे तेरा घर मोहल्ला मुस्लिम पंच कमिटी शिंदखेडाच्या वतीने ठराव करण्यात आला. या बैठकीत शहरातील सार्वजनिक मंडळाचे पदाधिकारी राजकीय,सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी,पत्रकार बंधू व शांतता समितीचे सदस्य उपस्थीत होते. हिरे म्हणाले की १४ सप्टेंबर पासून विविध सणांना सुरुवात होत आहे. त्यामुळे शहरासह तालुक्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत तसेच जातीय सलोखा टिकावा यासाठी होणारे सण उत्सव शांततेच्या मार्गाने सुरळीत पार पाडण्यासाठी हिंदू मुस्लिम बांधवांनी त्या पार्श्वभूमीवर सण उत्सव एकोप्याने सामंजस्याने साजरे करावे असे आवाहन केले. धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून वैफल्य व्हिडिओ,संदेश पोहोचणार नाहीत याची काळजी युवकांनी घ्यावी अशी सूचनाही त्यांनी दिली. पारंपरिक वाद्याने पर्यावरणपूरक उत्सव साजरा करावा,असे आवाहन तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळे यांनी केले.दरम्यान साऊंडसिस्टीमच्या आवाज मर्यादेसह मिरवणूक काढावी असे आवाहन पी.आय.दीपक पाटील यांनी केले. यावेळी माजी ग्रा.पं. सदस्य प्रकाश चौधरी, भाजपा शहराध्यक्ष प्रवीण माळी, ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत डागा, डॉक्टर इद्रिस कुरेशी, माजी नगरसेवक सुनील चौधरी,दीपक अहिरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रसंगी पोलिस पाटील युवराज माळी,अरुण देसले उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय खैरनार पोलीस पाटील वरसूस यांनी केले.चहापानानंतर बैठकीची सांगता करण्यात आली.शहरात ठीकठिकाणी कृत्रिम विसर्जन कुंड ठेवले जातील,श्रीगणेश विसर्जनाच्या मार्गक्रमण नुसार रस्त्यावर ज्या ज्या ठिकाणी खड्डे असतील त्या रस्त्यावरील खड्डे मुरूम टाकून बुजविण्याचे काम तात्काळ सुरू करण्यात येईल, तसेच बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांचे खड्डे बुजविण्याचा प्रयत्न करू, गणेश उत्सव दरम्यान स्ट्रीट लाईटची पाहणी करून उत्सवात कुठलेही विघ्न येणार नाही याची काळजी घेण्यात येईल.प्रबोधनात्मक देखावे,सामाजिक उपक्रम राबविले गेले असतील तर याची माहिती संकलन करून द्यावी जेणेकरून याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे राज्य शासनापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करू जेणेकरून आपल्या तालुक्यातील मंडळांना याचा लाभ मिळेल.

## ज्ञानेश्वर मासुळे यांचा रोटरी क्लबतर्फे नेशन बिल्डर अवार्ड पुरस्काराने सन्मान



**धुळे । प्रतिनिधी**

धुळे येथील परिवर्तन प्राथमिक विद्यालयाचे उपशिक्षक श्री ज्ञानेश्वर मासुळे यांना रोटरी क्लब ऑफ क्रॉस रोड धुळेतर्फे नेशन बिल्डर अवार्ड आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांच्या हस्ते श्री मासुळे यांना एका समारंभात पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, रोटरी क्लब ऑफ क्रॉस रोड धुळेच्यावतीने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणार्या शिक्षकास नेशन बिल्डर अवार्ड आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात येत असतो. त्याअनुषंगाने नुकताच श्री ज्ञानेश्वर मासुळे,उपशिक्षक परिवर्तन प्राथमिक विद्यालय धुळे यांना सदर पुरस्कार देण्यात आला. श्री ज्ञानेश्वर मासुळे ह्यांनी धुळे जिल्हयातील सामाजिक क्षेत्रात विशेष योगदान आहे. सामुदायिक विवाह सोहळा,विविध क्षेत्रातील गुणवंताचा सन्मान करुन प्रोत्साहन देणे, अडचणीत सापडलेल्या सर्वसामान्य नागरीकांना वैद्यकीय मदत करणे, ग्रामीण भागाशी नियमित संपर्कात राहून सामाजिक प्रबोधन व जागृतीची चळवळ राबविणे आदी सामाजिक कार्यात ते नेहमीच अग्रेसर असतात. दरम्यान संस्थेचे अध्यक्ष आणि सहकारी शिक्षकांच्या मदतीने परिवर्तन प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी म्हणून अवांतर शैक्षणिक उपक्रम राबविणे, मागासवर्गीय व गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करुन मार्गदर्शन करणेसाठी श्री ज्ञानेश्वर मासुळे नेहमीच कार्यरत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेत रोटरी क्लब ऑफ क्रॉस रोड धुळेने नेशन बिल्डर अवार्ड देवून गौरव केला आहे. नुकताच झालेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात धुळे जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता ह्यांच्या हस्ते आणि जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री मासुळे यांचा गौरव करण्यात आला.

## तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत कु. भुमिका प्रथम तर स्वरा द्वितीय



**होळनांथे । प्रतिनिधी**


शिरपूर एज्युकेशन संस्थेतर्फे आमदार अमरीशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत होळ ता. शिरपूर येथील जिल्हा परिषद मराठी शाळेतील कु. भुमिका जगदीश जाधव व कु. स्वरा पवन कापुरे या विद्यार्थ्यांनी लहान गटातुन अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला.

शिरपूर एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष तथा माजी शालेय शिक्षण मंत्री आमदार अमरीशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. सदर स्पर्धेत लहान गटात कु. भुमिका जगदीश जाधव व कु. स्वरा पवन कापुरे यांनी अनुक्रमे प्रथम विद्युतिय क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांचा शिरपूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री. सुरवाडकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तर शिक्षण विस्तार अधिकारी बी. एस. बुवा, निता सोनवणे, केंद्रप्रमुख प्रविण मराठे, आर. सी. पटेल मराठी शाळेचे मुख्याध्यापक सी. डी. पाटील, होळ जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक भटू पाटील (माळी गुरुजी), यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## देवरे अभियांत्रिकीत पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात विद्यार्थ्यांना मिळाली नोकरीची संधी

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर धुळे व श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आज महाविद्यालयात पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेकॅनिकल, ईलेक्ट्रॉनिक्स, ईलेक्ट्रीकल, प्रॉडक्शन, ऑटोमोबाईल, ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स् या शाखांमधील पदविकाधारक विद्यार्थ्यांसाठी या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्री राजू वाकुडे सहा आयुक्त कौशल्य विकास, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील, श्री मुकेश बोरसे जिल्हा कौशल्य विकास कार्यालय धुळे, बजाज ऑटो



अंतर्गत नमस्कार मॅक्रान सर्व्हिसेस प्रा लि पुणे चे रविकिरण पाटील, आशिष सिंग, महाविद्यालयाचे ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा प्रसाद विंचूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील यांनी प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. प्रा प्रसाद विंचूरकर यांनी प्रास्ताविकातून रोजगार मेळाव्याची संकल्पना मांडली. मुकेश बोरसे यांनी रोजगार मेळाव्या संदर्भात विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती दिली. बजाज ऑटो अंतर्गत मॅक्रान सर्व्हिसेस प्रा लि पुणे चे व्यवस्थापक आशिष सिंग व रविकिरण पाटील यांनी निवडप्रक्रियेचे कामकाज पाहिले. या रोजगार मेळाव्यात पन्नास हून अधिक विद्यार्थी विद्यार्थीनी सहभागी झाले होते त्यातील मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीमार्फत नियुक्ती पत्र देण्यात आले व निवड झालेले विद्यार्थी पुढील आठवडय़ात बजाज ऑटो कंपनीत कामावर हजर होणार आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे अभिनंदन करण्यात आले. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा आ बाबा साहेब कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष मा दादासाहेब सुभाष देवरे व प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनात ट्रेनिंग प्लेसमेंट विभागाने या रोजगार मेळाव्याचे संयोजन केले. या प्रसंगी कौशल्य विकास कार्यालयातील सौ खोंडे, महाविद्यालयातील सचिन भदाणे, आनंद कुलकर्णी व श्री माळी उपस्थित होते.

## मालेगावच्या हद्दीत घरफोड्या करणारे धुळ्यात जेरबंद

**धुळे ।** प्रतिनिधी मालेगावच्या हद्दीत धाडसी घरफोडी करणार्या टोळीला गजाआड करण्यात नाशिक ग्रामीण एलसीबीला यश आले आहे. धुळ्यातील चॅम्पियनसिंग भादा आणि साहिल शेख या दोघा हिस्ट्री शिटर गुन्हेगारांना शहरातून ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडून चोरीचा ऐवजही जप्त झाला आहे.

मालेगाव तालुक्यातील वडनेर खाकुर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेले समाधान बन्सीलाल मोरे यांच्या मालकीचे कुलस्वामिनी मोबाईल, नितीन शिंदे यांचे सीएससी सेंटर आणि गुलाबराव भदाणे यांच्या मालकीचे कृषी सेवा केंद्र चोरट्यांनी फोडले होते. ही घटना २ सप्टेंबर रोजी घडली होती. एकापाठोपाठ घडलेल्या घटनेने पोलिसांपुढे घरफोड्यांना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान होते. त्यानुसार सदर गुन्ह्यांचा समांतर तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशानुसार नाशिक ग्रामीण एलसीबीचे पीआय हेमंत पाटील यांनी एक विशेष पथक गठीत केले. त्यानुसार हे विशेष पथक दोन दिवसांपुर्वी धुळ्यात दाखल झाले होते.

## कै.अरविंद पाटील यांच्या द्वितीय पुण्यसमरणार्थ नेत्ररोग तपासणी शिबीर व कार्यशाळा

**दहिवेल । प्रतिनिधी**

येथील नवोदय शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. अरविंद माणिकराव पाटील यांच्या द्वितीय पुण्यसमरणार्थ दि १३ सप्टेंबर रोजी कै भाऊसाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन सभा संपन्न झाली.



कार्यक्रमचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक वसंतराव बच्छाव होते तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र माणिकराव पाटील व संचालिका सुनंदा अरविंद पाटील,संचालक कृपेश नांद्रे, सोनल नांद्रे, संचालक बाबासाहेब सत्यजित पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुनील देसले होते. यावेळी बोलताना प्रा डॉ सुरेश अहिरे यांनी भाऊसाहेबांच्या संस्थेच्या उभारणी व त्यासाठी घेतलेले कष्ट व भाऊसाहेबांच्या स्वभासवाचे धागे उलगडुन भावनिक वातावरण निर्माण केले.सोनल नांद्रे यांनी भाऊसाहेबांसारखे वडील मिळणे हे भाग्य असून स्वतःच्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करून जनकल्याण हेच ध्येय ठेवले व त्यासाठी अपार मेहनत केली व स्वतःच्या प्रकृती कडे दुर्लक्ष केले असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात आप्पासाहेब वसंतराव बच्छाव यांनी भाऊसाहेबांच्या स्मृतीला उजाळा दिला व त्यानिमित्त होत असलेले नेत्ररोग शिबिराला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमचे सूत्रसंचालन प्रा आय यु शेख यांनी केले.

कार्यक्रमचे प्रास्तविक प्रा डॉ राजेंद्र अहिरराव यांनी केले,तर पाहुण्यांचा परिचय प्रा डॉ योगेश कोरडे व प्रा डॉ एस ए पाटील यांनी केला.आभार प्रा निलेश खैरनार यांनी व्यक्त केले. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी प्रयोगातून विज्ञान कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत प्रा डॉ रवींद्रकुमार बावणे व भौतिकशास्त्र विभाग अन्नसाहेब बेंडाळे महाविद्यालय व प्रा दिलीप भारंबे ,सचिव ,मराठी विज्ञान परिषद जळगाव यांनी विविध प्रयोगातून विज्ञानाच्या संकल्पना स्पष्ट केल्या. त्यानंतर नेत्ररोग शिबिराचे उदघाटन संस्थचे उपाध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्या हस्ते झाले. परिसरातील १२५ नागरिकांनी याचा लाभ घेतला यात डोळ्यातील प्रेशर,मागील पडद्याची तपासणी,कॉम्प्युटर द्वारे डोळे तपासणी कसरण्यात आली. यावेळी यशोदा नेत्रालय हॉस्पिटल च्या संचालिका डॉ श्रद्धा मोरे,यांनी व त्यांच्या टीम मधील डॉ सैफ, टेक्निशियन स्टाफ श्री अनिल पवार(जळगाव), सौ दिव्या हेमराज पाटील,श्री हर्षल बदान( नाशिक),भगवान महाले,धुळे,यांनी शिबीर यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. कार्यक्रमचे आयोजन क्रीडा विभाग प्रमुख डॉ भालचंद्र मोरे व भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ आर बी अहिरराव यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

## १५ सप्टेबर ते २ ऑक्टोबर पर्यंत ’स्वच्छता ही सेवा’ उपक्रम

**धुळे । प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षी स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत स्वच्छ भारत दिवस २०२३ च्या निमित्ताने १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत स्वच्छता ही सेवा हा उपक्रम राबविला जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री प्रदीप पवार यांनी दिली.

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत हागणदारी मुक्त अधिक जिल्ह्यासाठी आणि शाश्वत स्वच्छतेसाठी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. अश्विनीताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शुभम गुप्ता, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री देवेंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री चंद्रकांत पवार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री बाळासाहेब बोटे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वच्छता ही सेवा २०२३ ची थीम कचरामुक्त भारत आहे. यामध्ये दृष्यमान स्वच्छता व सफाईमित्र कल्याण यावरती लक्ष केंद्रित केले आहे.

# धुळे जिल्ह्यात बैल पोळा उत्साहात साजरा

## शेतकऱ्यांमध्ये आनंदाचं वातावरण








धुळे।

बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या कष्टाचे आभार मानण्यासाठी काल महाराष्ट्रातील विविध ठिकाणी बैलपोळ्याचा सण आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच बैल पोळ्यानिमित सपत्नीक पूजन जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्राध्यापक अरविंद जाधव व सौ.जाधव यांनी केले. जिल्ह्यातही हा बैल पोळा साजरा करण्यात आला. या निमित्ताने प्रत्येक गावात शेतकरी बांधवांनी स्वत:च्या बैलांसोबत हा सण साजरा केला. गावातील देवी देवतेला शेतकऱ्यांनी बैलांबरोबर प्रदक्षिणा घालून पुढील वर्षी शेतात चांगले उत्पन्न निघू देत अशी प्रार्थना केली. बैलांना साजशृंगार करून हा बैलपोळा साजरा करण्यात आला. वर्षभर शेतात शेतकऱ्यांची मदत करण्यासाठी अपार कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचा सच्चा मित्र बैल यांना बैलपोळ्याच्या दिवशी गळ्यांत चंगाळी शिंगाना कलर अंगावर कलरने विविध प्रकारची सजावट अंगावर झुली या पध्दतीने पोळ्यानिमित्त बैलाची सजावट करण्यात आली होती. घरात पुरण पोळीचा स्वयपाक करुन बैलाची पुजा करुन बैलाना पुरणपोळी खाऊ घालण्यात आली. वर्षभर शेतातील विविध कामात शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या बैलाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा बैलपोळ्याचा सण साजरा करण्यात येतो. यावर्षी मागील काही आठवड्यांपासुन पावसाने उघडीप दिली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील असलेले प्रमुख पिक सोयाबीनच्या उत्पन्नात मोठी घट होऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडणार आहेत. मात्र तरीही बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मोठ्या उत्साहात शेतकऱ्यांनी हा सण साजरा केला आहे. बैलपोळ्या निमित्त या भागात शेतकरी दिवसभर उपाशी राहुन बैलाचा उपहास करतात बैलांना सायंकाळी पुरणपोळीचे जेवण दिल्यानतंरच शेतकरी जेवण करतात. बैल पोळ्यानिमित्त शेतकऱ्यांनी बैलाची सजावट करुन घरी पूरण पोळीचा स्वयपाक करुन सायंकाळी पाच वाजणेच्या सुमारास बैलाची व इतर पशुधनाची विधीवत पुजा करुन बैलाना व इतर पशुधनाला पुरणपोळीचे जेवण दिल्यानतंर शेतकऱ्यांनी जेवण करुण उपवास सोडला.

संकलन : दिपक वाघ




CMYK






# ‘आयुष्मान भव’मोहिमेला धुळे जिल्ह्यात सुरुवात

## लाभार्थ्यांना शोधून त्यांना लाभ देण्यात यावा : खासदार डॉ. भामरे




















धुळे । धुळे जिल्ह्यात आयुष्मान भव मोहिमेचे उद्घाटन खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्या शुभहस्ते जिल्हा रुग्णालय, धुळे येथे संपन्न झाले. जिल्हा रुग्णालय येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमास जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दत्ता देगावकर, भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अरुण मोरे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.एम.आर.शेख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सोनिया बागडे, डॉ.अश्विनी भामरे आदी उपस्थित होते. खासदार डॉ.भामरे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित राष्ट्राप्रमाणेच जनसामान्यांकरिता मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आयुष्यमान भारत योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा अनेक कुटूंब लाभ घेत आहे. या आयुष्यमान कार्डच्या माध्यमातून खाजगी दवाखान्यात अनेक उपचार मोफत केले जातात. जगातली सर्वात मोठी ही आरोग्य योजना असून ही यशस्वीपणे शेवटच्या व्यक्तींपर्यत पोहचणे आवश्यक आहे. यासाठी मोठया प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक ग्रामसभेत या योजनेची माहिती द्यावी. आयुष्यमान व आभाकार्ड काढण्यासाठी नोंदणी झाली नसेल अशा लाभार्थ्यांना शोधून त्यांना लाभ देण्यात यावा. रुग्णांचे चांगले आरोग्य राहण्यासाठी स्वच्छता अभियान राबविण्यात यावे, यासोबत रक्तदान चळवळीतील सहभाग गरजेपुरता न राहता ती सवयीची व्हावी अशी अपेक्षा खासदार डॉ. भामरे यांनी व्यक्त केली. तसेच या मेळाव्याच्या माध्यमातून आयुष्यमान कार्ड व आभाकार्ड मोठया प्रमाणात नोंदणी करावी. असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जिल्हाधिकारी श्री.गोयल म्हणाले की, नागरिकांना चांगल्या आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी आयुष्मान भव ही महत्वाकांक्षी मोहीम जिल्ह्यात १३ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत राबविली जाणार आहे. या मोहिमेत आशा सेविका, ग्रामपंचायत, ग्रामसेवक, समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड तसेच आभाकार्डची नोंदणी करून त्याचे वितरण करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, मानसिक समस्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील मुलांची तपासणी, रक्तदान मोहिम, अयवयदान जागृती मोहिम, स्वच्छता मोहिम, वय वर्ष १८ वरील पुरूषांची आरोग्य तपासणी मोहिम उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या पंधरवाड्यात आरोग्य यंत्रणा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहचणार असून या आयुष्मान भव मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी तपासणी करुन लाभ घ्यावा, असे आवाहन श्री.गोयल यांनी यावेळी केले.

संकलन : दिपक वाघ